
Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये




# AJANTA

ISSN 2277-5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL



Volume - X, Issue - I
January - March - 2021
English / Marathi Part - III / Hindi

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399 www.sjifactor.com

AJANTA PRAKASHAN

Scanned by CamScanner

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

## CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संत तुकारामांच्या अभंगातील भक्ती मूल्य<br>डॉ. अशोक भानुदासराव केंद्रे | १-५ |
| २ | संत साहित्यातील लोकशिक्षण<br>डॉ. ममता फुके | ६-१० |
| ३ | संत ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील नामभक्ती<br>प्रा. डॉ. डिगोळे बालाजी विठ्ठलराव | ११-१५ |
| ४ | संत निळोबांच्या अभंगातील 'एवढासा माझा भाव'<br>प्रा. डॉ. कल्याण गोपनर | १६-१८ |
| ५ | संत साहित्यातील समता विचार<br>डॉ. लोकचंद राणे | १९-२३ |
| ६ | कलियुगातील महान संत जनसेवानंद श्री सिद्ध सुभाष बाप्पा महाराज<br>डॉ. प. ना. पांचाळ | २४-२६ |
| ७ | संत कान्होपात्राच्या अभंगातील करूणा भाव<br>डॉ. सुशील प्रकाश चिमोरे | २७-३१ |
| ८ | संत तुकारामांच्या अभंगाची भाषा<br>जयश्री सुरेश बावर | ३२-३६ |
| ९ | संत चोखामेळा यांच्या साहित्यातील समतेचे विचार<br>प्रा. वैभव नानासाहेब कांबळे | ३७-३९ |
| १० | तुकारामांच्या अभंगातील निसर्ग आणि शेती विचार<br>प्रा. डॉ. चंद्रकांत शेरखाने | ४०-४३ |
| ११ | सतराव्या शतकात वैज्ञानिक विचारांना जोपासणारा संत - तुकाराम अंबिले<br>प्रा. विजय डी. झुंजारराव | ४४-४८ |
| १२ | संत तुकाराम महाराज यांच्या साहित्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन<br>प्रा. डॉ. दीपक सूर्यवंशी | ४९-५५ |
| १३ | वीरशैव तत्वज्ञानातील अष्टावरण संकल्पना<br>डॉ. सौ. कुलकर्णी एस. एन. | ५६-५९ |




VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

## CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | संत जनाबाईंच्या अभंगातील स्त्रीजीवनाचा आविष्कार<br>प्रा. माधवी सुरेंद्र पवार | ६०-६५ |
| १५ | संत मुक्ताबाई यांच्या साहित्यातील तत्वज्ञानात्मक विचार<br>डॉ. रत्ना लाला जवरास | ६६-७३ |
| १६ | वारकरी संप्रदायाचे ग्रंथलयामध्ये योगदान<br>रीता श्रीमंतराव कदम | ७४-७७ |
| १७ | 'ज्ञानेश्वरी' तील लोकशिक्षण - एक अभ्यास<br>प्रा. सौ. प्रेरणा एल. चव्हाण | ७८-८१ |
| १८ | संत साहित्यातील भक्ती विचार<br>प्रा. सौ. धनश्री राणे | ८२-८६ |
| १९ | तथागतांचा मध्यम मार्ग "अरियो अंठठङ्गिको"<br>ताजणे सिद्धार्थ कोंडीराम | ८७-९२ |
| २० | संत साहित्यातील सामाजिक प्रबोधन<br>प्रा. धनंजय भाट | ९३-९५ |
| २१ | संत साहित्यातील समता विचार<br>प्रा. डॉ. भारती अशोक बेंडाळे | ९६-१०० |




Scanned by CamScanner

तुका म्हणे तोचि संत, सोशी जनाचे आघात ।।

सुख पाहता जवापाडे। दुःख पर्वता एवढे ।।

दया क्षमा शांती, तेथे देवाची वसती ।।

निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेचि फळ ।।

सारांश

वारकरी संप्रदायामध्ये संत तुकाराम महाराजांचे वैचारीक कार्य अलौकिक मानले जाते.जगाच्या कल्याणार्थ संताची विभूती- ह्या ब्रीद वाक्याची सार्थकता त्यांच्या कार्यातून अभ्यासता येते. तुकोबाच्या विचारात वैज्ञानिकता पाहायल्या मिळते. सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक यासारख्या विषयांवर अलौकिक तत्वज्ञानात्मक मांडणी त्यांनी आपल्या अभंग रचनेतून केलेली दिसुन येते. अज्ञान आणि अंध:श्रध्देत अडकलेल्या समाजाला आपल्या विचारांद्वारे प्रबोधित करतांना त्यांच्यात सामाजिक परिवर्तन करून कर्मकांडाचे आघात समजून सांगितले. ढोंगीपणावर प्रहार करून माणसातला माणूस जागा झाल्याशिवाय दया, क्षमा, शांती, परोपकार वृत्ती इ. मनुष्यात संचार करत नाही. असे अनेक लोककल्याणकारी विचार त्यांनी आपल्या सामाजिक प्रबोधनातून समाजासमोर मांडल्याने त्यांना लोकशिक्षक म्हणून संबोधले जाते.

संदर्भ ग्रंथ

1. मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड दुसरा : भाग दुसरा (इ.स.1350 ते 1680)
2. संत तुकाराम आणि संत कबीर यांची बोधवचने - डॉ.कृ.ज्ञा.भिंगारकर
3. तुकाराम - डॉ.भालचंद्र नेमाडे, साकेत प्रकाशन,औरंगाबाद
4. संत तुकारामांची जीवननिष्ठा - डॉ.ल.का.मोहरीर
5. संत साहित्य व लोकसाहित्य - डॉ.तुषार चांदवडकर,कुसुमाग्रज प्रकाशन,नाशिक
6. श्री.तुकाराम चरित्र - ल.रा.पांगारकर,पुणे.
7. महाराष्ट्र सारस्वत - वि.ल.भावे,मुंबई





# १२. संत तुकाराम महाराज यांच्या साहित्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन

प्रा. डॉ. दीपक सूर्यवंशी
मराठी विभाग, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब.

प्रास्ताविक

महाराष्ट्र भूमी 'संत-महंत' 'सज्जनांची भूमी' असून गोदेच्या तीरावर अनेक प्रवाह निर्माण झालेले दिसून येतात. संतानी आपल्या उपदेशातून सामाजिक शाश्वत जीवनमूल्य सांगितली.संतसाहित्याची निर्मितीच मुळात 'अवघाची संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तिन्ही लोक' या उद्देशांने झाली असून अवघे विश्वचि माझे घर ही उदात भावना त्यांच्या कार्यात दडलेली आहे. त्यांनी समाजप्रबोधनाचे केलेले कार्य अनमोल असून समाजाच्या जडणघडणीत त्यांचे विचार दीपस्तंभाप्रमाणे आहेत.

दगडाला देव म्हणून त्यात ईश्वर शोधणाऱ्या भोळ्याभावड्या वारकऱ्यांची प्रेरणा म्हणजे संतश्रेठ निवृती, ज्ञानेश्वर,एकनाथ,नामदेव आणि तुकाराम महाराज असल्याची सांगितली जाते. संत नामदेवांनी आध्यात्मिक लोकशाहीची विचार आणि कृतीतून उभारणी केली आहे. मीपणाची निवृती म्हणून पहिला निवृतीनाथ, निवृती झाल्याशिवाय ज्ञान येत नाही, म्हणून दुसरा ज्ञानदेव, ज्ञान प्राप्त झाले की जीवन मार्ग सोपा होतो, म्हणून तिसरा सोपान आणि ज्ञान सोप्या मार्गाने गेले की ते आत्मा मुक्त होतो, म्हणून चौथी मुक्ताई. निवृती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताई म्हणजेच मानवी मनाच्या अवस्था असल्याचे वारकरी संप्रदायात सांगितले जाते. संतांनी केवळ मार्गदर्शन केले नाही, तर प्रपंच करून परमार्थ आणि सुखी राहण्याचा उपदेश दिला आहे. याबाबतीत सर्वश्रुत असलेला १३ व्या शतकातील बहिणाबाईचा अभंग समर्पक आहे.

*'संत कृपा झाली । इमारत फळा आली ।*

*ज्ञानदेवे रचिला पाया उभारिले देवालया ।*

*नामा तयाचा किंकर । तेणे केला विस्तार ।*

*जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत*

*तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।'*

१७ व्या शतकात आपल्या वयाची ४२ वर्ष तुकाराम महाराजांनी मानव जातीच्या उन्नती व कल्याणासाठी वेचले. खऱ्या अर्थाने अनेक जाती धर्म परंपरेत अडकून पडलेल्या बहुजन समाजाचे प्रबोधन करण्याचे एक मोठे कार्य संत तुकाराम यांनी केले आहे. अंधश्रद्धा, कर्मकांड, तीर्थयात्रा, यज्ञयाग , बुवाबाजी, व्रतवैकल्य, नवससायास, अंगात येणे, जादूटोणा, भ्रष्टाचार, अतिरेकीपणा आणि भोंदूगिरी अशा अनेक विकृत बाबीवर प्रहार करून लोकशिक्षकांची भूमिका बजावली. समाजप्रबोधनाचे कार्य केले. सर्वच स्तरातून

होणाऱ्या अंधश्रद्धांचे निर्मूलन करण्यासाठी विज्ञाननिष्ठा हाती घेतली. प्रत्येक रचनांमधून समाज पुरुषाला जागृत करण्याचे काम केले.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

- संत तुकारामांच्या वारकरी संप्रदायातील कार्याचा आढावा घेणे.
- समाजाला केलेला उपदेश परखड भूमिका विचारात घेणे.
- तुकारामांचे अभंग रचनेतून आलेले विविध विचार जसे पर्यावरण अंधश्रद्धा विज्ञानवादी भूमिका समजून घेणे.
- तत्कालीन समाजाला धर्माच्या जोखडाखाली असलेला बहुजन वर्गाला बाहेर काढतो, याची मीमांसा करणे.
- विविध वाङ्मयाच्या इतिहासातील ग्रंथातून अभिव्यक्त झालेले तुकाराम अभ्यासणे.
- संत तुकाराम व वारकरी संप्रदाय यांच्यातील परस्पर अनुबंध विचारात घेणे.
- प्रस्तुत शोधनिबंधामध्ये तुकारामांनी समाज केलेला उपदेश समजून घेणे.

**शोधनिबंधाची गृहितके**

- संत तुकाराम हे विद्रोही संत होते.
- प्रपंचात राहून परमार्थ साधता येतो. ही भूमिका त्यांनी मांडली.
- तुकाराम महाराजांनी आपल्या गाथेतून विविध विषयावर अभंग रचना केली.
- तुकाराम महाराजांची गाथा ही भारतीय समाजासमोर आदर्श आहे.
- कष्टातून व संघर्षातून सन्मार्गाने जीवन जगण्याचा उपदेश केला.
- तुकारामांच्या अभंग रचनेत पराकोटीची संवेदनशीलता दिसून येते.
- तुकाराम हे सरळमार्गी वारकरी संप्रदायातील संत होते.

**संशोधनपद्धती**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी वर्णनात्मक, विश्लेषणात्मक अभ्यासपद्धतीचा अवलंब केला आहे. दुय्यम साधने, प्रकाशित ग्रंथ, वृतपत्रे व विविध संदर्भ ग्रंथाचा आधार घेतला आहे. वारकरी संप्रदायात जेवायला ताट वाढल्यानंतर ताटाभोवती पाणी फिरवले जाते, पण नंतर थोडीशी जीभ ओली करून परमेश्वर नामस्मरणाने जेवणास सुरुवात केली जाते. पुढून त्यामागे एक शास्त्र असल्याचे सांगितले जाते, ते म्हणजे हवेतील असणारे जीवजंतूला पाणी फिरवल्याने ते तेथेच अडकून पडतात. जिभेवर पाणी घेतल्याने घसा ओला होतो आणि गिळण्याची प्रक्रिया सुलभ होते, ठसका लागत नाही. असे यामागचे विज्ञानाचे तत्व असल्याचे दिसते. पाखंडी लोकांवर प्रहार केला प्राणीमात्रावर दयाभाव दाखविला,सन्मार्गाने जीवन जगण्याचा उपदेश केला. संत कोणास म्हणावे? यावावत ते म्हणतात,





*"जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले,*
*तोचि साधु ओळखावा देव तेथेचि जाणावा"*

**संतान प्राप्तीसाठी वीर्य जननक्षम असावे**

संतान सुख ही प्रत्येकाची इच्छा असते. त्यासाठी विर्याची गुणवत्ता असावी लागते. बऱ्याचदा स्त्री पुरुषात काही दोष असतात. परंतु कोणत्याही कारणाने मूल होत नाही झाले, तर समाजमन निराश बनते, अशा वेळी अनेक प्रकारच्या अंधःविश्वास आला बळी पडते. शहर, महानगर व खेडे अशा सर्व ठिकाणी राहणाऱ्या व्यक्ती अनेक उपाययोजना बकऱ्या, कोंबड्या, अंगारे-धुपारे आणि साधुबुवाच्या मागे लागतात, असे वास्तव चित्र आहे. मात्र याबाबतीत वसंत ऋतूत एखाद्या वृक्षाला फुले फळे लागत नसतील, तर तो बहुत नसेल तर त्यात ऋतुचा दोष नाही. तसेच वांज स्त्रीला मूल होत नसेल, तर त्यात नवऱ्याचा दोष अथवा नवरा नपुंसक असेल तर बायकोने काय करावे? तिचा काय दोष नाही.

*'नाही निर्मळ जीवन । काय करील साबण ।*
*तैसे चित शुद्ध नाही । तेथे बोध करील काय ।*
*वृक्ष न धरी पुष्कळ । काय करील वसंत काळ ।*
*वांझा न होती लेकुरे । काय करावे भ्रतारे ।*
*नपुंसका पुरुषाशी । काय करील बाईल त्यासी ।*
*प्राण गेलिया शरीर । काय करेल वेव्हार ।*
*तुका म्हणे जीवनेवीण । पीक नव्हे नव्हे जाण ।'*

या वरील अभंग रचनेतून तुकोबाने खऱ्या अर्थाने समाजात वास्तव काय असावे खरे कोणते व्यवहारात कशाला महत्त्व आहे. हे रचनेतून विशाल गेले आहे. २१ व्या विज्ञान युगातही स्त्रियांनाच आपती प्रथम आहे, दोषी धरले जाते. पुरुषांचा दोष कोणी शोधत नाही मात्र सत्यता पडताळून पाहणे आवश्यक असते. नवससायास पुत्रकामेष्टी यज्ञ होमहवन व्रतवैकल्य आधी करण्यावर लोकांचा भर दिसतो. अंधश्रद्धेला खतपाणी देणे, समाजाला तुकाराम महाराज सार्थ असा सवाल करता,

'नवसे कन्या पुत्र होती । तरी का करणे लागे पती ।'

**हुंडापद्धतीवर प्रहार**

भारतीय समाजव्यवस्थेत हुंडापद्धती एक कलंक आहे. समाजातील शांततेचे अशांततेत रूपांतर, माणसाला माणूस बनविणारी, समाजाला विधायकतेपासून विघातकतेकडे घेऊन जाण्यासाठी ही कारणीभूत हुंडापद्धती आहे. सामान्य माणसाने यावर आवाज उठवला पाहिजे, ही पद्धती समूळ नष्ट होणे,अत्यंत गरजेचे आहे. त्यासंदर्भात ते पुढील रचनेत मांडतात

*"हाती होऊन दावित वेणा । करिती लेकीची धारणा ।*
*ऐसे धर्म झाले कली । पुण्य रंक पाप बळी ।*

*तुका म्हणे देवा । काय निद्रा केली धावा ।।*

**कुटुंबकल्याण राष्ट्रीय कार्य**

संत तुकाराम महाराजांनी लोकसंख्या ही सर्व समस्यांचे मूळ असल्याचे त्याकाळी सांगितले होते. प्राथमिक गरजा अन्न, वस्त्र आणि निवारा अशा मुलभूत गरजांना ग्रहण लागण्यात लोकसंख्येचा भस्मासुर हे मुख्य कारण आहे.

*"काय पोरे झाली फार । किंवा न साहे करकर ।*
*म्हणोनि केली सांडी । घास घेउनी लाहे तोंडी ।*
*करू कलागती । तुज भांडणे भावेती ।*
*तुका म्हणे ह्यचि । परी झाले परेचि ।।"*

घरात शांतता न राहण्याचे कारण म्हणजे पोरवडा फार असणे, लोकांची भांडणे येणे, प्रपंचात फळ व समाधान,कटकटी अनेक प्रकारे दुःखे याला कारणीभूत ठरतात, ते म्हणजे लोकसंख्या प्रचंड असणे. अशा परिस्थितीत दाताच्या कण्या केल्या तरी ते एकत्र येत नाहीत. परिणामी संतती मोजकी असावी असे स्पष्ट केले आहे.

**व्यसनमुक्तीचा संदेश**

व्यसन हे मानवासाठी अत्यंत घातक असून प्रत्यक्ष संकट. नाना प्रकारची व्यसने असतात. बिडी,काडी,माडी, ताडी अशा स्थलकाललांमध्ये अनेक व्यसनांनी सामान्य लोकांच्या घरादाराची प्रपंचाची राखरांगोळी केली. पान खाणे, गोहत्या समान, तंबाखू, चिलीम नाकातून धूर काढणे, म्हणजे प्रपंचाचे वाटोळे होई. या अनुषंगाने तुकाराम महाराज लिहितात

*"पाने जो खाईल बैसोनि । पडेल तयासी गोहत्या ते ।*
*तमाखू ओढूनि काढील जो धूर । बुडेल ते घर तेणे पापे ।*
*जात होती पाठी उडती यमदंड । त्याचे काळे तोंड तुका म्हणे ॥"*

वास्तविक आज शासकीय स्तरावरून व्यसनमुक्तीसाठी अनेक उपाय योजना होताना दिसतात. परंतु त्याचे दुष्परिणाम तुकाराम महाराजांनी अभंगातून सांगितले, त्यांची दूरदृष्टी दिसून येते.

**परस्त्री मातेसमान**

संत तुकारामांनी परस्त्रीला मातेसमान मानले, छत्रपती शिवराय, स्वामी विवेकानंद यांच्याप्रमाणेच त्यांचे परस्त्रीविषयीचे मत राहिले आहे. ते आपल्या अभंगातून

*'जाईये वो माये न करी सायास ।*
*आम्ही विष्णुदास तैसे न हो ।।*





भंडाराच्या डोंगरावर तुकाराम महाराज ध्यानसाधना गेले असताना एके दिवशी गावातील कुटील मंडळींनी त्यांना भ्रष्ट करण्यासाठी स्त्रीला तिकडे पाठविले होते.

**तुळशीचे वैज्ञानिक महत्त्व**

अंगणातील तुळशी वृंदावनाला भारतीय संस्कृतीमध्ये मांगल्याचे प्रतीक मानतात. हिंदुत्वाचे आणि गृहिणीच्या भाव भक्तीचे प्रतीक आहेत. त्याचप्रमाणे सर्वाधिक ऑक्सिजन देणारी वनस्पती आरोग्यदायी असल्याने तिचे सर्वांनी जतन संवर्धन करणे, आवश्यक आहे. वैष्णवांच्या गळा तुळशीच्या माळा म्हणजेच विठोबाच्या कृष्ण रूपातील वृंदावनातील तुळशीचा लळा याबाबतीत तुळशीचे महात्म्य तुकारामांनी अधोरेखित केले आहे.

*'जयाचिये द्वारी । तुळशी वृंदावन । नाही ते स्मशान गृह जाणा'*

**बळीराजा विषयीची आत्मीयता**

जगाचा पोशिंदा बळीराजा शेतकरी. शेतकरी सुखी तर सगळे सुखी, परंतु याच बाबतीत त्यांच्या विषयीची कृतज्ञता व्यक्त करणे, प्रत्येकाचे कर्तव्य आहे. तुकारामांनी त्यांच्यासाठी आठवण म्हणून दीपावली पाडव्याच्या दिवसाची आठवण म्हणून बलिप्रतिपदा सण साजरा करतात. बळी शेतकऱ्यांचा प्रतिनिधी-

*'इडापीडा टळो, बळीचे राज्य येवो'*

**मानवी जीवनाचे तत्वज्ञान**

संत तुकाराम महाराजांनी समाजजीवन व्यवहारातील सत्य आपल्या अनेक अभंग रचनांमधून रेखाटले आहे. सुखाचा क्षण कमी असला, तर दुःखाचा क्षण व्यावहारिक जीवनात अधिक हे तत्वज्ञान आहे. सुख दुःखातून मानवी जीवन परिपूर्ण बनते. तुकाराम महाराजांचे अभंग गाथा एकूण ४०९२ अभंगरचना समाविष्ट आहेत. त्यातील लोकप्रिय

*'कन्या सासुरासी जाए, मागे परतोनी पाहे*
*तैसे झाले माझ्या जीवा, कधी भेटसी केशवा ।*
*सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वताएवढे ।*
*शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी*
*तुका म्हणे तोचि संत, तोचि जनाचे आघात ।।*
*दया, क्षमा शांती तेथे देवाची वसति ।*
*निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेचि फळ ।।*

**पर्यावरण पूरक विचार**



Scanned by CamScanner

माणूस हा निसर्गातील एक घटक आहे. माणूस आणि निसर्ग यांच्यातील अतूट नाते असून एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आज वृक्षारोपण पर्यावरण संवर्धनासाठी जनजागृती लक्षावधीचा खर्च करून विविध माध्यमातून केले जात आहे. हे महत्वाचे कार्य तुकाराम महाराजांनी केले, ही बाब खरोखरच अत्यंत महत्वाची आहे. माणसं पशुपक्षी प्राणी, नदी-नाले, पर्वतराई इत्यादिंचे संरक्षण करण्याची प्रेरणा त्यातून दिलेली आहे.

*'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरी । पक्षीही सुस्वरे आळविती'*

जशास तसे असावे

तुकोबांनी समाजात चांगलाच घोप दिला, मदोन्मत होऊन माजलेले यांना नावे निर्णय घेऊन फिरणाऱ्यांना साध्या-सरळ शब्दात केलेला उपदेश पचत नाही. अशांना अतिशय तीव्र शब्दात ते भूमिका मांडतात,

*'जैसासाठी तैसे व्हावे, हे बरवे कळलेसे ।*
*ठकास महाठका जोडा, हे धडफुका लागारी ।*
*एकांगीचे भांडे तुका । नाही धोका जीविते ।।'*

आपण आपला विचार न करता दुसऱ्यांना सुख आनंद देण्यासाठी धडपडतो. पण ते एखाद्या विशिष्ट मर्यादेपर्यंत स्वीकारा त्यानंतर मात्र त्यास 'ठकास महाठक' अशी भूमिका असावी. असे सांगतात. या विषयीचे चिंतन पुढील रचनातून

*'आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ।*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्द वाटू धन जनलोका ।।*
*तुका म्हणे पहा शब्दचि हा देव । शब्दचि गौरव पूजा करू ।।'*

मानवी जीवनाच्या विविध प्रकाराच्या उत्कट अनुभवांना अत्यंत आशयघन शब्दात साकार करणारा एक शब्दप्रभू, अक्षरशः सर्वस्व पणाला लावून सांस्कृतिक व सामाजिक अन्यायाच्या विरोधात दंड थोपटणारा, एक आव्हान वीर, योद्धा, प्रतिभावंत भक्त, या तिन्ही भूमिकांचा एकत्र मिलाफ झालेला महापुरुष. म्हणजे विद्रोही, कवी, संत तुकारामांनी उपदेश केला. त्यात एके ठिकाणी

*'बोलावे खरे, बोलावे खरे । कोणाच्याही मनावर घाव नये घरे ।*
*थोडक्यात समजणे, थोडक्यात समजावणे । शब्दामुळे दंगल, शब्दामुळे मंगल ।*
*शब्दाचे हे जंगल । जागृत रहाव, जिभेवरी ताबा ।*
*सर्व सुखदाता पाणी, वाणी, नाणी मारू नये ।।'*

निष्कर्ष





- 'जगाच्या कल्याणा संतांची विभूती' हे ब्रीद वचन तुकाराम महाराजांचे एकूण जीवन कार्याकडे पाहिल्यास ते सार्थ ठरते. संत तुकाराम आणि व्यावहारिक दृष्टिकोनावर आधारीत विज्ञानिष्टा अधिष्ठित अभंग रचना केली.
- सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक अशा विविध विषयावर अलौकिक अशी तत्वज्ञानाची मांडणी करणारी त्यांची रचना केली आहे.
- जाती धर्म, अंध-श्रद्धा, गरीब, श्रीमंत अशा दुरसटलेल्या विचारांच्या लोकांना एकाच व्यासपीठावर आणण्याचे कार्य त्यांनी केले आहे. आपल्या लेखणीद्वारे चिरंतन मूल्य, स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय व नैतिकतेची शिकवण त्यांनी बहुजन वर्गाला दिली आहे.
- वारकरी संप्रदायातील तुकाराम महाराजांचे कार्य संपूर्ण मानवतेसाठी दीपस्तंभाप्रमाणे आहे. धार्मिक विचारातून सामाजिक परिवर्तन कर्मकांडावर आघात ढोंगीपणावर प्रहार केला संत तुकारामांनी दया, क्षमा,शांती ,अहिंसा व परोपकार या विचारांची बीजारोपण केले आहे. संत तुकारामांना त्यांच्या सामाजिक प्रबोधनाच्या कार्याबद्दल लोक शिक्षकाची उपमा दिली जाते.
- समाजजीवनात 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' या तत्वाप्रमाणे आपले संबंध आपण आपल्या वाणीतून निर्माण व निर्धारित करत असतो. अशा या शब्दांना अत्यंत महत्व आहे. संत विचार कालोघातही तितकेच महत्वाचे आहेत. आपल्या संस्कृतीचा अनमोल ठेवा आहे.
- तुकाराम महाराजा प्रमाणेच अनेक संतांच्या विचारात विज्ञाननिष्ठा दिसून येतात. अनेक संत व त्यांचे मौलिक विचार म्हणजे अनुभव रुपी विद्यापीठाचे विचार आहेत.

संदर्भ सूची

1. डॉ.चांदवडकर तुषार 'संतसाहित्य व लोकसाहित्य' 'कुसुमाग्रज प्रकाशन',नाशिक
2. शेणोलीकर ह.श्री. 'प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप' (आवृत्ती ५,१९९४) 'फडके बुक स्टोअर्स', कोल्हापूर
3. नेमाडे भालचंद्र 'तुकाराम' 'साकेत प्रकाशन', औरंगाबाद
4. डॉ. मोहरीर ल. म. 'संत तुकारामांची जीवननिष्ठा'
5. प्रा. शेळके /डॉ.भंडारे 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास' कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद
6. डॉ. पाटणे यशवंत 'जगाच्या कल्याणा संतांची विभूती' संस्कृती प्रकाशन, पुणे.



Scanned by CamScanner